**—: नियमीत दिवाणी दावा क्र.११२ सन २०१३ :—**
**—: निशाणी ७३ खालील आदेश :—**

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०२. वादी याने, प्रतिवादी सुधाकर गणपत सावंत यांचा उलटतपास न घेतल्यामुळे त्यांच्याविरूध्द 'उलटतपास नाही' असा झालेला आदेश रद्द करून उलटतपास घेण्यास परवानगी मिळावी यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, वादीने आपला पुरावा बंद केल्यानंतर प्रतिवादीने स्वत: व त्याच्यातर्फे एक साक्षीदार यांचा पुरावा दिलेला असून प्रतिवादीचा सरतपास झाल्यानंतर वादीचे वकीलांनी उलटतपासाला मुदत घेतली. त्यानंतर वादीतर्फे दिलेला मुदतीचा अर्ज मे. न्यायालयाने फेटाळलेला आहे. त्यानंतर प्रतिवादीचा वादीतर्फे उलटतपास झालेला नाही. त्यानंतर प्रतिवादीने एक साक्षीदार तपासला व तो साक्षीदार उलटतपासाला हजर न राहिल्याने त्या साक्षीदाराचा उलटतपास झालेला नाही. त्यामुळे उलटतपास न घेण्यामागे वादीचा कोणताही दोष नाही. वादीला या दाव्यामध्ये स्वारस्य असून वादीकडून पुरेशी माहिती न मिळाल्याने प्रतिवादीचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे वादीविरूध्द 'उलटतपास नाही' असा आदेश झालेला आहे. प्रतिवादीचा उलटतपास न घेण्यामागे वादीचा कोणताही दोष नव्हता. सदर प्रतिवादीचा उलटतपास घेण्यास जर वादीला संधी मिळाली नाही तर त्यांचे अपरिमीत स्वरूपाचे नुकसान होणार आहे. त्यामुळे 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द होवून वादीला प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

०३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज प्रतिवादीला याला मान्य नाही. दिनांक १९/११/२०१८ रोजी प्रतिवादीचा सरतपास झाल्यानंतर वादीतर्फे उलटतपासाला मुदती घेतल्याने दि. १०/०१/२०१९ रोजी अर्ज नामंजुर करून उलटतपास नाही असा आदेश झाला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी सुधाकर गणपत सावंत याचे सरतपास प्रतिज्ञापत्र दि.१९/११/२०१८ रोजी दाखल करण्यात आले आहे. त्यादिवशी वादीतर्फे वकीलांनी प्रतिवादीचा उलटतपास घेण्यास मुदत मागितल्याने त्यादिवशी त्यांना मुदत देण्यात आली. त्यानंतर दिनांक १०/०१/२०१९ रोजी वादी व वादीतर्फे वकील गैरहजर असल्याने त्यांचेविरूध्द 'उलटतपास नाही' असा आदेश झालेला आहे. त्यानंतर दिनांक ०४/०२/२०१९ रोजी प्रतिवादीतर्फे सा.नं.२ बाळा गोपाळ राणे यांचा सरतपास नोंदविण्यात आला व त्यादिवशी वादीतर्फे वकीलांनी उलटतपास घेण्यास अर्ज देवून मुदत मागितली व तो अर्ज मंजुर करण्यात आला. प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश झाल्याची वादीला पूर्ण जाणीव असतानाही प्रतिवादीतर्फे साक्षीदार नं.२ याचा उलटतपास घेण्यासाठी वारंवार मुदतीचे अर्ज दाखल केले आहेत. प्रस्तुतचा अर्ज वादीने सुमारे ०८ महिने विलंबाने दाखल केला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापनेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं. १ व २ यांनी आपली कैफियत दाखल करून दावा आव्हानीत केला आहे. दोन्ही बाजुंच्या परस्पर विरोधी कथनांवरून वादमुद्दे निश्चित केले आहेत. वादीचा पुरावा पूर्ण झाला असून प्रतिवादीच्या वतीने पुरावा सादर केला आहे. अशा प्रसंगी प्रतिवादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची वादीस संधी देणे आवश्यक आहे. परंतु 'उलटतपास नाही' हा आदेश झाल्याची वादीला पूर्ण जाणीव असतानाही त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास केलेला विलंब दृष्टीआड करता येणार नाही. सबब दोन्ही पक्षामध्ये असलेला वाद गुणदोषावर अंतिमत: निर्णित करण्यासाठी प्रतिवादीचा उलटतपास नाही असा वादीविरूध्द झालेला आदेश रद्द करून त्याला प्रतिवीदचा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायसंगत होणारे आहे. सबब वादी उचित खर्च आकारून अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीताम ी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

—: **आ दे श** :—

०१. वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी खर्चाची रक्कम रूपये ३००/— (रूपये तीनशे मात्र) तात्काळ प्रतिवादींना अदा करावेत. त्यानंतरच वादीला प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात येईल.

०३. वरीलप्रमाणे आदेशाची पूर्तता करण्यास वादी यानी कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द झाला असे समजण्यात येईल.

सही/—
( सदानंद पाटील )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.

दिनांक :— ०४/०१/२०२०.